MHGA130002192023

सत्र खटला dz-९५/२०२३
(जुना क्र.०६/२०२२)
सरकार तर्फे पोलीस स्टेशन मुलचेरा
—विरुध्द— सुनिर्मल सरकार

<u>निशाणी ११ वरील आदेश</u>
(दि.०९/०२/२०२४)

१. अर्जदार सुनिर्मल सुनिल सरकार राह. भगतनगर, तह. मुलचेरा, जि. गडचिरोली याने मुलचेरा पोलीस स्टेशन येथील अप.क्र.२५६/२०२१ मध्ये जप्त केलेले दुचाकी वाहन हिरो कंपनीची स्पलेंडर प्रो क्रमांक एमएच—३३/के—०५८७ सुप्रतनाम्यावर मिळण्याबाबत अर्ज केलेला आहे. सदरची दुचाकी वाहन अर्जदाराचे मालकीचे आहे. त्याकरीता त्यांनी दस्ताऐवजाची यादीप्रमाणे वाहनाचा नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, वाहनाचा विमा प्रमाणपत्राच्या प्रती, आधार कार्ड दाखल केलेले आहेत.

२. सदर प्रकरणात सरकारी वकिल श्री भांडेकर यांनी अर्जदाराचे अर्जाचे मागे त्यांचे लेखी म्हणने सादर केले की, सदर वाहन हे प्रकरणात जप्त करण्यात आले आहे. सदर वाहन अर्जदाराने घटनेच्या वेळी वापरलेले आहे. या घडीला सदर वाहन हे पुराव्याचा भाग असल्याने सुप्रतनाम्यावर देण्यात येवू नये अशी विनंती केलेली आहे.

३. अर्जदाराचे वकील तसेच सरकारी वकिल श्री भांडेकर यांनी केलेला युक्तीवाद ऐकला. सदर वाहन अर्जदार नामे सुनिर्मल सुनिल सरकार यांच्या मालकीचे असून ते वाहन अर्जदाराचे मालकीचे असून त्यास दैनंदिन कामकाजाकरीता वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. अर्जदार या गुन्हयात स्वत: फिर्यादी आहे.

४. सदर वाहन पोलीस स्टेशन मुलचेरा येथे वरील गुन्हयात जप्त असून ते उघडयावर पडून असल्याने ती खराब होण्याची दाट शक्यता आहे. वाहन जप्त असल्यामुळे अर्जदाराला त्याचे दैनंदिन कामाकरीता फार अडचण निर्माण होत आहे. जप्त मालमत्ता पोलीस स्टेशनमध्ये पडुन राहिल्यास तिचे तांत्रीक नुकसान होवु शकते. अशा परिस्थीतीत सदरचे वाहन अर्जदाराला परत करणे न्यायोचित होईल कारण अर्जदाराला जप्त मुद्देमाल परत देतांना सुंदरभाई विरुध्द गुजरात सरकार एआयआर २००३ सुप्रीम कोर्ट ६३८ या न्यायनिवाडयात दिलेल्या मार्गर्शन तत्वाप्रमाणे परत देणे न्यायोचित ठरते. करीता मी खालीलप्रमाणे अंतीम आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशानी ११ मंजुर करण्यात येत आहे.

२. अप.क्र. २५६/२०२१ मध्ये जप्त केलेले दुचाकी वाहन हिरो कंपनीची स्पलेंडर प्रो क्रमांक एमएच–३३/के–०५८७ हे अर्जदार सुनिर्मल सुनिल सरकार राह. भगतनगर, तह. मुलचेरा, जि. गडचिरोली याला रु.५०,०००/– नुकसान भरपाई पत्र (Indemnity Bond) आधारे परत करण्यात यावे.

३. तपासी अधिका–याने सदर मुद्देमाल अर्जदार याचे खर्चाने चार छायाचित्र काढुन घ्यावेत व त्याबाबतचा पंचनामा तयार करावा व तो पंचनामा आणि छायाचित्र दोषारोपपत्रासोबत जोडावेत.

४. अर्जदार याला असे निर्देशीत करण्यात येते की, सदरची मालमत्तेच्या स्वरुपात बदल करु नये अथवा विक्री अथवा कोणासही हस्तांतरीत करु नये. तसेच तपासणी अधिकारी अथवा न्यायालय आदेश करतील तेव्हा ती मालमत्ता हजर करावी.

स्वा/–

(र. ना. बावनकर),
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहेरी.

स्थळ–अहेरी
दि. ०९.०२.२०२४